कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजनांसाठी निधी वितरित करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
शासन निर्णय, क्रमांक: सीएलएस-२०२१/प्र.क्र.१२१ /म-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२१

संदर्भ : १) केंद्र शासन,गृह मंत्रालय,यांचे पत्र क्र. ३३-४/२०२०-NDM-I, दि. १४ मार्च, २०२०
२) केंद्र शासन,गृह मंत्रालय,यांची पत्रे क्र. ३३-४/२०२०-NDM-I, दि.२८ मार्च, २०२०, दि.१५ एप्रिल, २०२१
३) शासन निर्णय, समक्रमांक, दि. १६.३.२०२० , दि. २८.३.२०२०, दि.०३.४.२०२०,दि. २१.४.२०२०, दि. २९.५.२०२० व दि. २५.६.२०२०
४) शासन निर्णय,क्रमांक :सीएलएस-२०२०/प्र.क्र.१९८/म-३,दि.२७.७.२०२० व दि.२९.७.२०२०
५) शासन निर्णय, क्रमांक :- सीएलएस-२०२०/प्र.क्र.२५३/म-३, दि.३०.०९.२०२०
६) शासन निर्णय, क्रमांक :- सीएलएस-२०२०/प्र.क्र.१९८/म-३, दि.१६.०४.२०२१
७) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे क्र. मशा-७(५)/नै.आ.व्य./कावि-३६२/२०२१, दि.२१.०६.२०२१
८) विभागीय आयुक्त, पुणे यांचे क्र.संसता/कावि-३/२०२१/५७५, दि.२३.०७.२०२१
९) विभागीय आयुक्त, कोकण यांचे क्र.मशा/कार्या-६/कोव्हीड-१९/SDRFनिधी मा./कावि/२०२१, दि.१९.०५.२०२१
१०) विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे क्र.२०२०/महसूल/नै.आ./पाट/सीआर-१३, दि.२१.०६.२०२१

प्रस्तावना:

राज्यामध्ये कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या विविध उपाययोजना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून निधी मागणीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली छाननी करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक ६ येथील शासन निर्णयान्वये विभागीय छाननी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर विभागीय छाननी समितीने संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून निधी मागणीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून त्यांच्या शिफारशी संदर्भाधीन क्रमांक ७ ते १० येथील पत्रान्वये शासनास पाठविल्या आहेत. विभागीय छाननी समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशींवर निर्णय घेण्यासाठी राज्य कार्यकारी समितीची बैठक दिनांक २३.०८.२०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार राज्य कार्यकारी समितीने दिनांक २३.०८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार कोव्हीड-१९ संदर्भातील विविध उपाययोजना करण्यासाठी निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी चालू आर्थिक वर्षामध्ये राज्य आपत्ती प्रतिसाद निधींची मानके व बाबींनुसार करावयाचा खर्च भागविण्याकरिता विभागीय आयुक्त, नागपूर, कोकण, औरंगाबाद व पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या बाबी विचारात घेऊन राज्य कार्यकारी समितीने दि.२३.०८.२०२१ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विभागीय आयुक्त, नागपूर, कोकण, औरंगाबाद व पुणे यांच्यामार्फत संबंधित जिल्हाधिकारी यांना रू.५६०४.८३ लक्ष (रूपये **छप्पन्न** कोटी चार लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

या शासन निर्णयाव्दारे वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचा विनियोग खालील बाबींपैकी विभागीय छाननी समितीच्या बैठकीत मान्य केलेल्या बाबींवर तसेच संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयान्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून अनुज्ञेय असलेल्या बाबींवर खर्च करण्यात यावा.

1. Measures for quarantine center, sample collection and screening :

(a) Provision for temporary accommodation, food, clothing, medical care etc. for people affected and sheltered in quarantine camps (other than home quarantine) or for cluster containment operations.

(b) Cost of consumables for sample collection.

(c) Support for checking screening and contact tracing.

2. Procurement of essential equipment's/labs for response to COVID-19:

(a) Cost of setting up additional testing laboratories within the Government and the cost of consumable and testing kit.

(b) Cost of personal protection equipment for healthcare, municipal, police and fire authorities

(c) Cost of Thermal Scanners, Ventilators, Air Purifiers, Oxygen generation and storage plant in hospitals, strengthening ambulance services for transport of patients, setting up containment zones, Covid-19 hospital, Covid-19 care centers and consumables in the Government hospitals.

२. राज्य कार्यकारी समितीने घेतलेल्या निर्णयानुसार खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वरील बाबींवरील खर्च भागविण्यासाठी अनुक्रमे **विभागीय आयुक्त, कोकण , विभागीय आयुक्त, पुणे, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व विभागीय आयुक्त, नागपूर यांना एकूण रू.५६०४.८३ लक्ष (रूपये छप्पन्न कोटी चार लक्ष त्र्याऐंशी हजार फक्त)** इतका निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अ.क्र.	विभागीय आयुक्त	जिल्हा	राज्य कार्यकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार अनुज्ञेय रक्कमेच्या ३०% वितरीत करावयाचा निधी (रूपये लाखात)
१	२	३	४
१	विभागीय आयुक्त, कोकण	पालघर	२२३.४५
		ठाणे	१८७४.९९
		रायगड	३९५.७२
		सिंधुदूर्ग	१७९.६३
		एकूण - अ	**२६७३.७९**
२	विभागीय आयुक्त, पुणे	सांगली	६०९.४९
		सातारा	४५१.०६
		पुणे	२१५.५९
		एकूण-ब	**१२७६.१४**
३.	विभागीय आयुक्त, औरंगाबाद	उस्मानाबाद	४३८.६१
		औरंगाबाद	५१२.५८
		बीड	२०६.५९
		एकूण-क	**११५७.७८**
४.	विभागीय आयुक्त, नागपूर	गोंदिया	३९७.१२
		गडचिरोली	१००.००
		एकूण-ड	**४९७.१२**
चालू आर्थिक वर्षातील खर्चासाठी निधी (अ+ब+क+ड)			**५६०४.८३**

उपरोक्त प्रमाणे मंजूर निधी बीम्स प्रणालीवर संबंधित विभागीय आयुक्त यांना कार्यासन म-११ यांनी वितरित करावा.

३. विभागीय छाननी समितीने बैठकीमध्ये विहित केलेल्या मर्यादेत खर्च करण्यात यावा. कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून देखील करण्यात यावा. मात्र वर मंजूर केलेला निधी खर्च करताना राज्य शासनाच्या इतर विभागाच्या योजनांमधून किंवा राष्ट्रीय आरोग्य अभियानामधून त्याच बाबींवर खर्चाची व्दिरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

सदर निधी खर्च करताना खालील अटी व शर्तीचे विशेषत्वाने पालन करण्यात यावे :-

१) कोव्हिड -१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अन्य योजनातून सदर बाबी प्रस्तावित केलेल्या नाहीत याबाबत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने खात्री करणे बंधनकारक राहील जेणे करुन द्विरुक्ति होणार नाही.

२) आवश्यक तेथे प्रशासकीय, तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया राबविण्याची दक्षता घ्यावी.

३) आवश्यक तेथे निविदा मागविणे, स्वीकृती करणे व खरेदी बाबीचे सर्व निकष शासनाच्या त्या त्या वेळेच्या प्रचलित कार्यपध्दती व धोरणा नुसार राहतील या बाबत दक्षता घेण्यात यावी.

४) RT-PCR किट्स बाजार भावानुसार खरेदी करताना RT-PCR किट्स व VTM किट्स यांचे हॉफकिन बायोफार्मा लिमिटेड यांनी निश्चित केलेल दर विचारात घेवून न्युनतम दराने खरेदी करण्यात यावी. तसेच औषधे व साहित्य सामुग्री स्थानिक पातळीवर खरेदी करताना निविदे नुसार प्राप्त झालेल्या दरासोबत हाफकिन कडील दर, इतर उपलब्ध दर यांची तुलना करुन न्युनतम दराने खरेदी करण्याची दक्षता घेण्यात यावी.

५) खरेदी करतांना विभागातील सर्व जिल्हयासाठी दर सर्वसाधारण समांतर असतील याची दक्षता घ्यावी.

६) Covid Medicine / Lab kits - RT-PCR Kit / rapid antigen / Antibody या बाबींसाठी नविन पुरवठा धारक/ उत्पादक उपलब्ध होत आहेत. त्यामुळे प्रत्येक वेळी खरेदी करतांना याची माहिती घेऊनच खरेदी करावी. नवीन पुरवठा धारक उपलब्ध होत असल्यामुळे बाजारभाव कमी होत आहेत. त्यामुळे एकाच वेळी मोठी खरेदी करण्यात येऊ नये.

७) जिल्हा प्रशासनाने प्रत्यक्ष आवश्यकता व उपयोगिता तसेच मनुष्यबळाची उपलब्धतता या बाबी पुनश्चः खरेदीच्या वेळी पडताळणी करण्याची दक्षता घ्यावी.

८) Antigen/ Remdesiver/Flavipiravir / N९५ यांची खरेदी कमी प्रमाणात व कमी कालावधीसाठी करणे आवश्यक आहे. शक्यतो १५ ते २० दिवसांची खरेदी करण्यात यावी. दर निश्चिती झालेली असली तरी प्रत्येक वेळी दराबाबत पडताळणी करावी. मोठी ऑर्डर दिल्यास कमी होणा-या दराचा फायदा खरेदी विभागास मिळावा अशा प्रकारची अट खरेदी आदेशात अंतर्भूत करणे आवश्यक राहिल.

९) Temporary Facility निर्माण करतांना रुग्ण संख्या व Daily Case Load बघणे आवश्यक आहे. शक्यतो उपलब्ध शासकीय संस्था किंवा शासकीय इमारत यांच्या उपलब्ध इमारतीत बदल करुन तयारी करण्यात यावी. जिल्हयातील उपलब्ध शासकिय खाटा, खाजगी रुग्णालयातील उपलब्ध खाटा आणि खोल्या यांची संख्या लक्षात घेऊनच नवीन Temporary Centers तयार करावेत.

१०) कार्यरत केलेले CCC किमान ७५ टक्के भरल्यानंतरच नवीन CCC कार्यान्वित करण्याचा विचार करावा.

११) प्रक्षेपित प्रकरणे (Projected Cases) आणि O२ Bed ची उपलब्ध संख्या यावर Liquid O२ tank ची आवश्यकता अवलंबुन राहील. खरेदी करतांना याची पडताळणी करुनच खरेदी करावी. शक्यतो शासकिय / नगरपालिका / महानगरपालिका यांच्यासाठी Liquid O२ tank ची खरेदी करावी. खाजगी किंवा तात्पुरता निर्माण करण्यात येणा-या सुविधांमध्ये शक्यतो Dura cylinders / Jumbo cylinders यांचा वापर करावा. Liquid O२ बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सूचना विचारात घेऊनच कार्यवाही करण्यात यावी.

१२) मनुष्यबळ भरताना काळजी घेणे आवश्यक आहे. सर्व संस्थासाठी सरसकट मनुष्यबळ देण्यात येऊ नये. रुग्ण नसतांना CCC/ DCHC कार्यान्वित करुन १०० टक्के लागणारे मनुष्यबळ भरण्यात येऊ नये. जुने CCC / DCHC ७५ टक्के भरल्यानंतरच पुढील संस्था सुरु कराव्यात व त्यानुसार मनुष्यबळ भरण्यात यावे.

१३) वैद्यकीय उपकरणे व साहित्य सामुग्री खरेदी उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा मधील अटी व शर्तीच्या अधिन राहुन तसेच शासनाचे परिपत्रक दि.३०.१.२०१९ तसेच दि. २८.२.२०१९ व दि.२९.६.२०१९ व त्यानंतर काही मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या असल्यास त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

१४) शासन परिपत्रक दि. २४/०३/२०२० अन्वये कोव्हिड -१९ कालावधीत जिल्हा स्तरावर उपलब्ध अनुदानातुन खरेदी करण्याकरिता जिल्हाधिका-याच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकार प्रदान करण्यात आले असल्याने त्यांच्या मान्यतेने जिल्हा स्तरावरील खरेदीची कार्यवाही करण्यात यावी. ज्या बाबींची राज्य स्तरावरुन खरेदी करण्यात येते त्या बाबींची राज्य स्तरावरुन खरेदी करून होत असलेल्या पुरवठयाचा विचार करुनच खरेदीची आवश्यकता निश्चित करावी. सदर खरेदी करतांना बाजार भावाचा विचार करुनच खरेदी करण्यात यावी. सदर बाबी खरेदी करताना विहीत पंचसुत्री नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच खरेदी बाबत आरोग्य सेवा आयुक्तालयाकडुन व सार्वजनिक आरोग्य विभागाकडुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सुचना व मार्गदर्शक तत्वे यांचे पालन करावे.

१५) वरील प्रमाणे बाबी खरेदी करतांना त्यासाठी असणा-या तांत्रिक विनिर्देशाप्रमाणे ती असल्याची खात्री करावी. खरेदीची कार्यवाही प्राप्त अनुदान मर्यादेतच करण्यात यावी. आवश्यकतेनुसारच खरेदी करण्यात यावी. औषधे , पुरवठा व साहित्य विनावापर पडुन राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

५. वरील निधी खर्च करताना संदर्भाधीन क्रमांक ३ व ५ येथील शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे पालन करण्यात यावे. तसेच ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. सदर निधी अनावश्यकरित्या आहरित करून बँक खात्यामध्ये काढून ठेवण्यात येवू नये. या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या मर्यादेतच खर्च करण्यात यावा.

६. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेल्या निधीतून दरमहा करण्यात आलेल्या खर्चाचा तपशील केंद्र शासनाने तयार केलेल्या www.ndmis.mha.gov.in या प्रणालीमध्ये संबंधित जिल्हयांनी भरावा. सदर माहिती या प्रणालीमध्ये न भरल्यास पुढील निधी वितरीत केला जाणार नाही.

७. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा. तसेच राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

८. वरील प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, प्रधान लेखाशीर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ८०, सर्वसाधारण , ८००, इतर खर्च, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०२) कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यावरील खर्च (अनिवार्य), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर)(२२४५ ४१४१) या लेखाशीर्षाखाली पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध तरतुदीमधून भागविण्यात यावा.

९. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक : अनौ.सं.३९१/२०२१/व्यय-९, दिनांक १२.१०.२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२१११०२१५१२३४९५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Sanjay Audumbar Dharurkar
Date: 2021.11.02 16:15:21 +05'30'

(संजय औं. धारूरकर)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई,
३. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
४. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
५. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय,मुंबई,
६. प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग),जी.टी.हॉस्पीटल, मुंबई,
७. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. विभागीय आयुक्त, नागपूर, कोकण, औरंगाबाद, पुणे
९. जिल्हाधिकारी,गोंदिया,सिंधुदूर्ग,उस्मानाबाद,औरंगाबाद,बीड,सांगली,सातारा, गडचिरोली, पालघर, ठाणे, रायगड, पुणे, मुंबई शहर
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
११. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१२. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१३. लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, गोंदिया, सिंधुदूर्ग, उस्मानाबाद,औरंगाबाद,बीड,सांगली,सातारा, गडचिरोली, पालघर, ठाणे, रायगड, पुणे
१५. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

१६. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१७. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१८. कार्यासन अधिकारी (म-११), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१९. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२०. निवड नस्ती (कार्यासन/ म-३)